# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.

E-mail : scholarshiphd@gmail.com

Web : www.dhepune.gov.in फॅक्स नं. ०२०/२६१११११५३

फोन नं. ०२०/२६१२६९३९


दिनांक : ०५/०९/२०१३

क्र. उशिसं/शिष्यवृत्ती/पी.एम्.एस्./२०१३-१४/१४अई/283

प्रति,

१) संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.

२) कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य. (कृषी / अकृषी/ तंत्र/पशुविज्ञान/ आरोग्यविज्ञान/ मुक्त विद्यापीठे)

**विषय : अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना सन २०१३-१४ च्या अंमलबजावणीबाबत.**

**मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध व पारशी** या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिक्षणासाठी केंद्र शासन पुरस्कृत मॅट्रिकोत्तर (Post Matric) शिष्यवृत्ती योजना राज्यामध्ये सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेचा लाभ राज्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना घेता यावा यासाठी विद्यार्थ्यांचे नवीन शिष्यवृत्ती (Fresh) व शिष्यवृत्तीचे नुतनीकरण (Renewal) करण्यासाठी या संचालनालयाकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये सदर योजना ही केंद्र शासनामार्फत ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये महाराष्ट्र राज्यासाठी नवीन (Fresh) शिष्यवृत्तीसाठी ४५१८९ संच निर्धारित केलेले आहेत. नवीन शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची शेवटची मुदत ३० सप्टेंबर २०१३ ही केंद्र शासनामार्फत निर्धारित करण्यात आलेली आहे. पोस्ट मॅट्रिक अल्पसंख्यांक शिष्यवृत्तीची सविस्तर माहिती, अर्ज करण्याची पद्धत, संकेतस्थळ, पात्र अभ्यासक्रम तसेच इतर अनुषंगिक माहितीबाबत या संचालनालयाच्या वतीने दिनांक २५ व २९ जुलै २०१३ रोजी राज्यातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून जाहिरात देऊन त्यास प्रसिद्धी दिलेली आहे. तसेच सदर जाहिरात या संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. (जाहिरातीची प्रत सोबत जोडली आहे.)

**आपल्या अधिनस्थ असलेल्या महाविद्यालयांमधील / संस्थांमधील पदविका अभ्यासक्रमास असलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घ्यावा, यासाठी आपल्या स्तरावरुनदेखील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.**

शिक्षण संचालक
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.
यांचेकरिता

Director, SSD

19/9

उपकुलसचिव (शैक्षणिक)
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक

आवक क्र. 5596 दि. 20/9/13

आवक क्र. 969 दि. 20/9/2013

कुलसचिव कार्यालय
आवक क्र.: 3434
दिनांक : 13/09/2013